MHGO060002382026

**<u>एम. जे. सी. क्र. ५/२०२६ चे निशाणी क्र. १ खालील आदेश</u>**

**उमेश व ईतर – वि.– निरंक**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी कलम ३ व ७ बॉम्बे रेग्युलेशन कायद्यानुसार दाखल केलेला आहे. सदरचा अर्ज अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी सादर केला आहे.

२. अर्जदारांनी असे कथन केले आहे की, अर्जदार क्र. ३ ही मयताची पत्नी, अर्जदार क्र.१, २, ४ व ५ हे मयताचे मुल मुली असून मयत गणेशराम धर्माजी भेंडारकर यांचा मृत्यु दिनांक २८.०७.२०२० रोजी झाला आहे. मयत गणेशराम धर्माजी भेंडारकर हे मौजे घुसोबाटोला, ता. अर्जुनी/मोरगांव, जि. गोंदिया येथील रहीवासी होते. अर्जदार असे कथन करतात की, त्यांना अर्जदारांव्यतिरीक्त ईतर कुठलेही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार हेच मयत गणेशराम धर्माजी भेंडारकर यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांना शासकीय, निमशासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्राची अत्यंत आवश्यकता आहे. करिता अर्ज मंजुर होण्यास विनंती केली आहे.

३. अर्जदारांनी वृत्तपत्रामध्ये जाहीर प्रगटन काढून हरकत मागविण्यात आली. सदरचे जाहीर प्रगटन हे दिनांक १८.०२.२०२६ रोजीच्या 'नवराष्ट्र गोंदिया' आवृत्तीमध्ये प्रसिध्द करण्यात आले परंतु ३० दिवसांच्या कालावधीत सदर प्रकरणात कोणीही हरकत उपस्थित केलेली नाही. त्यामुळे सदर प्रकरण विना हरकत, विना उजर आणि विना आक्षेप चालविण्यात आले आहे.

४. अर्जदार क्र. १ यांनी त्यांचे अर्जाचे पुष्ठर्थ प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. १३ दाखल केले. त्याने त्याच्या सरतपासात त्याच्या अर्जाशी सुसंगत बाबी शपथेवर कथन केल्या आहेत. अर्जदाराने कागदोपत्री पुराव्यामध्ये मयत गणेशराम धर्माजी भेंडारकर यांचे मृत्यु प्रमाणपत्राची पडताळणी केलेले प्रत नि. क्र. १४, पोलिस पाटील घुसोबाटोला यांनी दिलेले वारसान प्रमाणपत्र नि. क्र. १५, अर्जदार क्र. १ व ३ यांच्या आधारकार्डाची पडताळणी केलेली प्रत नि. क्र. १६ व १७, अर्जदार क्र. २, ४ व ५ यांच्या आधारकार्डची झेरॉक्स प्रत आर्टीकल अ, ब, क वर तसेच दिनांक १८.०२.२०२६ रोजीचे 'नवराष्ट्र गोंदिया' मध्ये प्रसिध्द झालेले जाहीर प्रगटन निशाणी क्र. १८ वर दाखल केलेले आहे. सदर

अर्जात हरकतदार कोणीही नसल्याने अर्जदारांचा पुरावा व प्रस्तुत दस्ताऐवज विना उजर व आक्षेपविना राहीले आहे.

५. अर्जदारांनी पुरावा बंद केल्याबाबतची पुरसिस निशाणी क्र. १९ वर दाखल केली आहे. संपुर्ण दस्ताऐवजांचे अवलोकन केले असता व वकीलांचा युक्तिवाद ऐकला असता, अर्जदार हेच मयत गणेशराम धर्माजी भेंडारकर यांचे वारस असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देणे न्यायसंगत वाटते. करिता खालील आदेश.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करण्यात आला.

२. अर्जदार क्र. १ श्री उमेश गणेशराम भेंडारकर, अर्जदार क्र.२ श्री मधुकर गणेशराम भेंडारकर, अर्जदार क्र.३ श्रीमती अहील्या बे. गणेशराम भेंडारकर, सर्व रा. घुसोबाटोला, ता. अर्जुनी/मोरगांव, जि.गोंदिया, अर्जदार क्र. ४ सौ. सुलोचना शालिकराम कठाणे, रा. साईनगर हुडकेश्वर नागपुर, ता. जि. नागपुर व अर्जदार क्र. ५ सौ. रेखा वाल्मीक कोरे, रा. पात्री, ता. लाखनी, जि. भंडारा हे मयत गणेशराम धर्माजी भेंडारकर यांचे कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांना आवश्यक ते न्यायालयीन शुल्क अदा केल्यानंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

NEHA VIJAY SHAHU

Digitally signed by NEHA VIJAY SHAHU
Date: 2026.03.18 16:45:58 +0530

(श्रीमती एन. व्ही. साहु)

दिनांकः–१८.०३.२०२६

दिवाणी न्यायाधिश, क. स्तर,
अर्जुनी/मोरगांव